# श्री शाहू मंदिर महाविद्यालय, पुणे–४११ ००९

## सूचना

दि. १३.१.२०११

महाविद्यालयातील इ. ११ ते पदव्युत्तर अभ्यासक्रमास शिकणाऱ्या अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की, यापुढे आपणास भारत सरकारकडून मिळणारी कोणत्याही प्रकारची शिष्यवृत्तीची रक्कम ही राष्ट्रीयकृत बँकेमार्फतच वितरीत केली जाणार आहे. त्यासाठी आपले राष्ट्रीयकृत बँकेत बचत खाते असणे आवश्यक आहे. तरी वरील प्रवर्गातील सर्व विद्यार्थ्यांनी त्वरीत राष्ट्रीयकृत बँकेत खाते उघडावे. नाही उघडल्यास सन २०१०–११ या वर्षापासून शिष्यवृत्तीचे अनुदान वितरीत केले जाणार नाही याची नोंद घ्यावी. बचत खाते उघडल्यानंतर सदर विद्यार्थ्यांनी स्वत:च्या नांवासह व महाविद्यालयाच्या नांवासह खाते क्रमांक विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, पुणे यांच्या कार्यालयास कळवावे. सोबत विभागीय समाज कल्याण अधिकारी, पुणे यांच्या पत्राची प्रत जोडली आहे.

**प्राचार्य**

# बँक खाती नाही, तर शिष्यवृत्ती नाही

इयत्ता ११ वी पासून पदव्युत्तर अभ्यासक्रमापर्यंत शिकणा-या अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना भारत सरकार शिष्यवृत्ती ते शिकत असलेल्या महाविद्यालयांमार्फत वितरीत करण्यात येते. शिष्यवृत्तीची रक्कम विद्यार्थ्यांना बँकेमार्फत परस्पर वितरीत करण्याचा निर्णय (ई-स्कॉलरशिप) शासनाने घेतला आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांची राष्ट्रीयकृत बँकेत खाती काढावयाची आहेत. या संदर्भात अनेकवेळा महाविद्यालयांच्या प्राचार्यांच्या बैठकीत चर्चा होवून कार्यवाहीबाबत सविस्तर सूचना दिल्या आहेत. तरी सर्व प्राचार्यांनी आपापल्या महाविद्यालयातील अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना राष्ट्रीयकृत (core sector) बँकेत खाते काढण्याबाबत सूचना द्याव्यात. विद्यार्थ्यांची व महाविद्यालयांची राष्ट्रीयकृत बँकेत खाती न उघडल्यास, शासनाच्या आदेशाप्रमाणे सन २०१०.११ या शैक्षणिक वर्षापासून शिष्यवृत्तीचे अनुदान वितरीत केले जाणार नाही याची नोंद घ्यावी व आवश्यक ती कार्यवाही करावी. बचत खाती उघडल्यानंतर विद्यार्थ्यांच्या नावासह व महाविद्यालयाच्या नावासह खाते क्रमांक विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांचे कार्यालयास कळवावेत, जे महाविद्यालय व विद्यार्थी बँकेत खाते उघडणार नाहीत, अशा महाविद्यालयांना व विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप/फ्रीशीपचे अनुदान मिळणार नाही. तरी सर्व मागासवर्गीय विद्यार्थ्यांनां व महाविद्यालयांना असे आवाहन करण्यात येते की, त्यांनी जवळच्या कोअर बँकिंग सुविधा असलेल्या राष्ट्रीयकृत बँकेत तात्काळ खाती उघडुन ई स्कॉलरशिप योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

(एस.बी.भंडारे)
विभागीय समाज कल्याण अधिकारी,
पुणे विभाग, पुणे

| Notice Board | |
|---|---|
| Display | Withdrawal |
| | |

26/12/2010

शा.फो.झिं.मु.,पुणे-१